जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान
अभियानांतर्गत "शहरी गरीबांना मुलभूत सुविधा
पुरविणे " या उप कार्यक्रमाच्या अंमलबजावणी-
अंतर्गत अकृषिक परवानगी व अकृषिक
आकारणी माफ करणेबाबत...

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-एनएपी-२००७/प्र.क्र.७५/ल-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ जून, २००८

वाचा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एनएपी-१००२/७४ युओआर/प्र.क्र.७१/ल-५
दिनांक २/११/२००२.

## शा स न नि र्ण य

लोक आवास योजना व वाल्मिकी आंबेडकर योजनेतंर्गत "शासकीय/ निमशासकीय जमिनीवर वसलेल्या झोपडपट्टयांच्या जागेवर बांधण्यात येणा-या घरांसाठी अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही. खाजगी जमिनीवर वसलेल्या झोपडपट्टयांच्या ठिकाणी राबविण्यात येणा-या योजनेसाठी अकृषिक परवानगी शुल्क आकारण्यात येऊ नये." असा निर्णय उक्त दिनांक २/११/२००२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला होता. सद्यःस्थितीत केंद्र शासनाच्या शहर विकास तसेच शहरी रोजगार व दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाने शहरी भागातील झोपडपट्टीवासियांचे जीवनमान उंचावण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आरोग्यास अपायकारक अशा परिस्थितीत राहणा-या झोपडपट्टीवासियांसाठी **राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम व वाल्मिकी आंबेडकर आवास योजना बंद करुन जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान जाहिर केले आहे.** त्यानुसार वरील अभियानांतर्गत शहरी गरीबांकरिता मुलभूत सुविधा पुरविण्याचा उप कार्यक्रम राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने उक्त दिनांक २/११/२००२ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

२. तथापि, दिनांक २/११/२००२ चा शासन निर्णय जरी रद्द करण्यात आला तरी, लोक आवास योजना व वाल्मिकी आंबेडकर योजनेतंर्गत देण्यात आलेल्या सवलती सदर योजना चालू असताना ज्या जमीनीवर अशी प्रयोजने उभी राहिली आहेत ती प्रयोजने चालू असे पर्यंत त्या सवलती तशाच चालू राहतील.

३. तसेच जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास या उप कार्यक्रमांतर्गत केवळ "गृहनिर्माण प्रकल्प राबविणे" (शासकीय/निमशासकीय जमीनीवर) या गटात ज्या झोपडपट्टया संबंधीत जागेवर उभ्या आहेत, तेथे उक्त योजनेतंर्गत जी महानगरपालिका/नगरपालिका असा आराखडा तयार करेल अशा जागेवरील निर्माण होणा-या *"गृहनिर्माण संकुलातील इमारतींना"* अकृषिक *परवानगी आवश्यक असणार नाही.* तसेच खाजगी जमिनीवर वसलेल्या झोपडपट्टयांच्या ठिकाणी राबविण्यात येणा-या योजनेसाठी अकृषिक परवानगी शुल्क आकारण्यात येणार नाही. **तथापि, या क्षेत्रातील निवासी कारणा व्यतिरिक्त वाणिज्यीक वा औद्योगिक कारणाकरिता वापरण्यात येणा-या गाळेयांना अकृषिक आकारणी आवश्यक राहील.**

कृ.मा.प.....

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक 20080623153137001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रमाकांत असमर)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रती,

१) सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ०५ प्रतीत),
२) सर्व जिल्हाधिकारी (प्रत्येकी १० प्रतीत)
३) महालेखापाल-१, मुंबई, महाराष्ट्र राज्य, (५ प्रती)
४) महालेखापाल-२, नागपूर, महाराष्ट्र राज्य,(५ प्रती)
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,(२ प्रती)
६) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,(२ प्रती)
७) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई-४०००३२,(२ प्रती)
८) गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.(२ प्रती)
९) महसूल व वन विभाग, कार्यासन टी-२/ब-१/ब-२/म-५, मंत्रालय, मुंबई-४०००३२,(प्रत्येकी २ प्रती)
१०) पीएसी कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२,(२ प्रती)
११) वेब को-ऑडीनेटर, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, (१ प्रत)
१२) निवड नस्ती, ल-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत, माहितीस्तव सविनय सादर,

मा.मुख्यमंत्री यांचे उप सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई-४०० ०३२,
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२,
(प्रत्येकी १ प्रत)/

--------